**नि.दिवाणी दावा क्रं.५२/२०१३**
**नि. क्रं.३३ लगत.**

**:: अर्ज निशाणी ६३ वरील आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र.७ व ८ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.सी. अपसिंगेकर यांच्यामार्फत शपथेवर सूरू ::**

१२. मी १२ वी उत्तीर्ण आहे. माझे १२ वी चे शिक्षण वडमुरंबी येथे झाले. मी प्रथम वर्षाला औसा येथे प्रवेश घेतला होता. माझ्या वडिलांना भाऊ किंवा बहीण नाही. माझे वडील कुटुंबाचे कर्ते होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील कुटुंबामध्ये निर्णय घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी प्रतिवादी क्र.७ व ८ यांना जमीन विकलेली आहे. मी खरेदीखताच्या फेरफाराविरुध्द लेखी आक्षेप घेतला नव्हता. मी आजपर्यंत सदर फेरफाराविरुध्द आक्षेप घेतलेला नाही. मी माझ्या वडिलांविरुध्द खरेदीखताच्या अनुषंगाने तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.७ व ८ हे खरेदी दिनांकापासून जमीन कसतात.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी हैद्राबाद येथे राहण्यापूर्वी माझ्या वडिलांसोबत सणसवाडी ता. शिरूर जि. पूणे येथे राहत होतो. हे मला माहीत नाही की, माझ्या वडिलांनी सणसवाडी येथील घर जिजामाता पतसंस्था यांच्याकडे गहाण ठेवलेले होते. माझे वडील शिवणकाम करीत होते. विकलेल्या जमिनीचा व्यवहार कुठे झाला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी सणसवाडी येथील घराचे गहाणखत सोडवून घेण्यासाठी प्रतिवादी क्र.७ व ८ यांना सदर जमीन विकली होती.

शेत जमीन परत घेण्याबाबत प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्यासोबत करारनामा झाला किंवा कसे हे मला माहीत नाही. मी प्रतिवादी क्र.७ व ८ यांना माझ्या हिस्स्याची मागणी केली होती.

१४. साक्ष प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्र.१० मधील मजकूर माझ्या दाव्यामध्ये लिहिलेला नाही. तो का लिहिलेला नाही याचे मी कारण सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमिनीमध्ये १/६ हिस्सा असल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना दारू पिण्याची सवय असल्याचे आणि कायदेशीर गरज नसताना जमीन विकल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत बेकायदेशीर असल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२५/०५/२०१३ रोजी माझ्या वडिलांना किंवा प्रतिवादी क्र.७ व ८ यांना हिस्सा मागितलेला नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.१५/११/२०२५.